# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२२८/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. विरेन्द्र कारुजी मेश्राम, मु. सिंगडझरी, पो. वासेरा, ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर-४४१२२३ | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिंदेवाही, ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिंदेवाही, ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर |

**सुनावणी दिनांक :- १७.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ३०.०४.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : विहीत मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची पाठराखण केली.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २०.१२.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २००५ ते माहिती मिळेपर्यंत.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : सिंदेवाही तहसिल कार्यालय मधील महसुल विभागातील संपुर्ण सा.झा ची नमुना-९ मधील कागदपत्रांची संपुर्ण फाईल आर.टी.आय. लोगोसहीत साक्षांकित करुन मिळण्यात यावी.

(५)जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सिंदेवाही यांनी दिनांक २६.१२.२०२१ रोजी सदर माहिती अर्ज मंडळ अधिकारी (सर्व),

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

सिंदेवाही/नवरगाव/मोहाळी नले यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केलेला आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ३१.०१.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ३१.०१.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : संबंधित सर्व मंडळ अधिकाऱ्यांनी आजपर्यंत मागितलेली माहिती पुरविलेली नाही.

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार सिंदेवाही यांनी दिनांक २२.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून, सर्व मंडळ अधिकारी यांनी अर्जदार यांनी मागितलेली माहिती नियमानुसार शुल्क आकारुन १५ दिवसाचे आत अर्जदार यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेश पारीत करण्यात आले.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२.०२.२०२२ रोजीच्या आदेशात सशुल्क माहिती पुरविण्याबाबत आदेशित केले आहे. परंतु विहीत मुदतीत माहिती पुरविली नसल्यामुळे विनामुल्य माहिती पुरविण्याबाबत आदेश होणे अपेक्षित असतांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी चुकीचे आदेश पारीत केले आहे.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, अपिलार्थी यांचा २०.१२.२०२१ रोजीचा माहिती अर्ज दिनांक २६.१२.२०२१ रोजी मंडळ अधिकारी (सर्व), सिंदेवाही/नवरगाव/मोहाळी नले यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केलेला आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार सिंदेवाही यांनी दिनांक २२.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून, सर्व मंडळ अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती नियमानुसार शुल्क आकारुन १५ दिवसाचे आत अर्जदार यांना उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार मंडळ अधिकारी, सिंदेवाही यांनी दिनांक २५.०२.२०२२ रोजी अपिलार्थीस एकूण ४६७३४ पृष्ठांसाठी रु.२/- प्रमाणे एकूण ९३४६८/- रुपये शुल्काचा भरणा करण्याबाबत सुचीत केले आहे. तसेच मंडळ अधिकारी, मोहाळी(नले) यांनी दिनांक २५.०२.२०२२ रोजी अपिलार्थीस एकूण ३०९५० पृष्ठांसाठी रु. २/- प्रमाणे एकूण ६१९००/- रुपये शुल्काचा भरणा करण्याबाबत सुचीत केले आहे. तसेच मंडळ अधिकारी, नवरगाव यांनी दिनांक २५.०२.२०२२ रोजी अपिलार्थीस एकूण ३४१०० पृष्ठांसाठी रु. २/- प्रमाणे एकूण ६८२००/- रुपये शुल्काचा भरणा करण्याबाबत सुचीत केले आहे. परंतु अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आलेली नाही.

तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही साधारणत: २० तलाठी कार्यालय यांचेकडून संकलित करावयाची असल्यामुळे माहिती संकलित करण्यास विलंब झालेला होता. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करण्याबाबत सुचीत केले होते.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★नागपूर★

६. **निष्कर्ष –**

१. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, त्यात माहितीच्या कालावधीमध्ये सन २००५ ते माहिती मिळेपर्यंत नमूद केले आहे. सदर कालावधी हा साधारणत: १६ वर्षाचा आढळून येतो. तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही २० तलाठी कार्यालय यांचेकडून संकलित करुन द्यावयाची असल्यामुळे माहिती संकलित करण्यास विलंब झालेला आढळून येतो.

२. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे कलम ७(९) नुसार देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ७(९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ मधील नियम ३(क) नुसार ही माहिती देय नाही.

२. सबब, प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★नागपूर★

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१२.२०२४**

जावक क्रमांक 758 दिनांक 14 FEB 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर